डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली. ता.दापोली,जि.रत्नागिरी.

जा.क्र./मसंकें/प्रअवा/५१७/२०२२. दिनांक 17 JAN 2022

## जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग या प्रक्षेत्रावर सन २०२१–२२ या आर्थिक वर्षात वाकवली विभागातील नारळ बागेत झावळे जमा करणे व त्याअनुषंगाने नारळ बागेतील इतर कामे करणे नियोजित आहे. सदर नियोजित कामे दिनांक ०१/०२/२०२२ ते २५/०३/२०२२ या कालावधीत ठेका पध्दतीने करणे गरजेची आहेत. सदर कामांचा सविस्तर तपशिल व त्यासाठी लागणाऱ्या मजुरांची संख्या याची माहिती खालील रकान्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | कामासाठी आवश्यक मजुर |
|---|---|---|
| १) | नारळ बागेतील झावळे जमा करणे व एकत्र ढिग करून ठेवणे. | ३८ |
| २) | नारळ बागेतील फळे एकत्र जमा करून भांडारात जमा करणे. | २० |
| ३) | नारळ बागेतील झाडांना सुक्ष्म सिंचनाने पाणी देणे व त्याची देखभाल व दुरूस्ती करणे. | २० |
| ४) | नारळ बागेतील झाडांच्या बुंध्यातील गवत काढणे, मल्चिंग आच्छादन करणे. | १० |
| ५) | नारळ बागेतील केळी लागवडीमध्ये गॅप फिलींगसाठी खड्डे काढणे व केळी लागवड करणे. | ८ |
| ६) | नारळ बागेतील नारळ फळे नारळ नर्सरी करण्यासाठी चर काढुन रूजत घालणे. | १० |
| | एकुण युनिट | १०६ |

वरील कामे ठेका पध्दतीने १०६ मजुर युनिटच्या सहाय्याने दिनांक ०१/०२/२०२२ ते २५/०३/२०२२ या कालावधीमध्ये करावयाची आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी आपले प्रति दिन प्रति मजुर युनिटचा दर तसेच १०६ मजुर युनिटसाठी अपेक्षित मजुरीची नोंद असलेले दरपत्रक दिनाक२८/०१/२२ पर्यंत बंद लिफाफ्यात पोष्टाद्वारे या कार्यालयास पोहोचेल असे पाठवावे.

ठेकेदारास कामाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील, तसेच वरील कामाबाबतची प्रत्यक्ष माहिती मा.संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली ता.दापोली यांचे कार्यालयास सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत मिळेल.

- **कामाच्या अटी व शर्ती:–**

१) ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरूप पाहुनच दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.

२) ठेका मंजुरी आदेश प्राप्त होताच मंजुरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनानुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे. दरपत्रकासोबत पॅनकार्ड ची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

३) प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधित कार्यालयामार्फत केला जाईल. पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधीतकडे जमा करावयाचे आहे.

४) ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या उर्वरीत बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढिल ठेक्याच्या वेळी गृहित धरले जाणार नाह ठेक्याबाबत करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत रदद केला जाईल आणि ज्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही

(PTO)

Scanned by CamScanner

५) ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बॅंक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्यांचे बॅंक खाती **NEFT/RTGS** धनाकर्षादवारे करण्यात येईल.

६) ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्यासंबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

७) कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/मजूरांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किंमत व सुलकरण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

८) ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

९) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक **SLP-5443/90** नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेकाकालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

१०)ज्याकंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरुपात रू. १००/— बॉण्ड पेपरवर करणे बंधनकारक राहील कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

११) शासन निर्णयानुसार पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातुन आयकर कपात करण्यात येईल.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र,वाकवली
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

प्रत माहितीसाठी सादर...

१ नोटिस बोर्ड मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
२ नोटिस बोर्ड भासुयो/कंदपिके मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.
३ ग्रामपंचायत वाकवली/इनामपांगारी/टेटवली/सुखदर/कुंभवे.

Scanned by CamScanner

जा.क्र.मसंकें/प्रअवा/५७८ /२०२२,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी,
दिनांक 17 JAN 2022

प्रति,
मा.प्रभारी अधिकारी,
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली.

**विषय:— नारळ बागेतील झावळे जमा करणे व त्याअनुषंगाने येणारी इतर कामे ठेका पध्दतीने करण्याच्या जाहिरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी देणेबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग प्रक्षेत्रावरील नारळ बागेतील झावळे जमा करणे व त्याअनुषंगाने येणारी इतर कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. तरी याबाबतची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर **(www.dbskkv.org)** प्रसिध्द करावी ही विनंती.

**सोबत:—वरीलप्रमाणे**

आपला विश्वासू

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

Scanned by CamScanner